इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांवर यथोचित मार्ग काढण्यासाठी तज्ञांची समिती स्थापन करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः बैठक-०६२३/प्र.क्र.७३/अधिनियम
नवीन मंत्रालय, ९ वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ३० ऑक्टोबर, २०२३

प्रस्तावना :-

इलेक्ट्रोहोमिओपॅथी व्यावसायिकांवर बोगस वैद्यकीय व्यावसायिक ठरवून वारंवार होणाऱ्या कारवाई पासून संबंधितांचे संरक्षण करण्याच्या हेतूने इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने दि. २५.०७.२०२३ रोजी मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे-

| अ. क्र. | समिती सदस्यांचे नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | संचालक, आयुष संचालनालय, मुंबई. | सदस्य |
| ३. | डॉ. बाहुबली शहा, माजी प्रशासक, महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी परिषद, मुंबई. | सदस्य |
| ४. | डॉ. सतीश जगदाळे, अध्यक्ष, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी, पुणे. | सदस्य |
| ५. | डॉ. प्रशांत सोनवणे, संघटना प्रतिनिधी, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी पुणे. | सदस्य |
| ६. | डॉ. एम. एच. पानगव्हाणे, संघटना प्रतिनिधी, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी पुणे. | सदस्य |
| ७. | श्री. जनक जोशी, मुख्य प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई. | सदस्य सचिव |

२. सदर समितीने सर्व संबंधित कायदे, नियम व विविध न्यायनिवाडे इ. अभ्यास करून इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठीचा अहवाल दोन महिन्यांत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अनिल चौरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई,
११. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई,
१२. डॉ. बाहुबली शहा, माजी प्रशासक, महाराष्ट्र राज्य होमिओपॅथी परिषद, मुंबई,
१३. डॉ. सतीश जगदाळे, अध्यक्ष, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी, पुणे,
१४.डॉ. प्रशांत सोनवणे, संघटना प्रतिनिधी, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी पुणे,
१५. डॉ. एम. एच. पानगव्हाणे, संघटना प्रतिनिधी, मेडिकल असोसिएशन ऑफ इलेक्ट्रोहोमिओपॅथी पुणे,
१६. श्री. जनक जोशी, मुख्य प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
१७. निवडनस्ती, (अधिनियम).